**प्रेसनोट** **दि.२७/०३/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**अनाथ महिलेचा अंत्यःसंस्कार**

एक महिला,वय ३० वर्षे,रा.जांभुळवाडी,आंबगाव पठार,कात्रज,पुणे या मर्गीगल्ली,बुधवार पेठ, पुणे येथे आजारी अवस्थेत मिळुन आल्याने त्यांना उपचारकामी ससुन हॉस्पीटल,पुणे येथे ॲडमिट केले होते. सदर महिलेचा उपचार दरम्यान मृत्यु झाला. सिधेश्वरी ॲम्ब्युलन्सचे दादा जाणीव सामाजीक संस्था व फरासखाना पोलीस स्टेशन यांनी मिळुन सदर महिलेचा अंत्यःसंस्काराचा विधी पुर्ण केला.

सदरची महिला बुधवार पेठेतील कायाकल्प या संस्थेत काम करीत होत्या. त्या आजारी असल्याने त्यांना ससुन हॉस्पीटल,पुणे येथे ॲडमिट केल्यानंतर त्यांचेवर उपचार चालु असताना त्या मयत झाल्या. त्यांना कोणी नातेवाईक नसल्याने सिधेश्वरी ॲम्ब्युलन्सचे दादा जाणिव सामाजीक संस्थेचे कार्यकर्ते मा.रविंद्र कदम, मा.सागर पाटील, मा.चेतन मराठे यांनी फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे येथे येवुन सदर महिलेचा अंत्यःसंस्काराचा विधी करण्याची तयारी दर्शविली. त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे महिला हिचा अंत्यसंस्कारचा विधी करण्यात आला. त्याबाबत सिधेश्वरी ॲम्ब्युलन्सचे दादा जाणीव सामाजीक संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी पोलीसांचे आभार मानले.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे्